# BDC LIBRARY

## News Paper Clipping

## A.Y. 2025-26

# सतार आणि तबल्याच्या जुगलबंदीची अनुभूती

**वार्ताहर**
पाटण

आंतरराष्ट्रीय कीर्तीचे सुप्रसिद्ध युवा सतारवादक अर्जुन वर्मा यांच्या अनोख्या सतारवादनाची सुरेल मैफल येथील कोयना एज्युकेशन सोसायटीच्या डॉ.अब्दुल कलाम सभागृहात रंगली. अवघ्या काही क्षणातच त्यांच्या सतारवादनाने उपस्थित संगीतप्रेमी अक्षरशः मंत्रमुग्ध झाले. रसिकांनी टाळ्यांच्या गजरात उत्स्फूर्त दाद देताना शास्त्रीय संगीताचा अवीट आनंद लुटला.

चौगुले ग्लोबल ग्रुप गोवा व कोयना एज्युकेशन सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने सतारवादन कार्यक्रमप्रसंगी चौगुले ग्लोबल ग्रूप तसेच इंडस्ट्रीजचे चेअरमन विजय चौगुले, कोयना एज्युकेशन सोसायटीचें जनरल सेक्रेटरी अमरसिंह पाटणकर, भाजप नेते, जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक सत्यजितसिंह पाटणकर, संस्थेचे संचालक याज्ञसेन पाटणकर, संजीव चव्हाण, पृथ्वीराज पाटील, जॉईंट सेक्रेटरी डॉ. सुहास देशमुख, प्रभारी प्राचार्य व्ही. ए. कळंत्रे, राजन वाघ, उदय अवतारे, प्रमोद घाडगे आदींसह मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.





अर्जुन वर्मा यांनी आपल्या अनोख्या मैफलीची सुरुवात राग भीमपलाशने केली. त्यानंतर त्यांनी एकापाठोपाठ अनेक रागांची मैफल सजवत अखेरीस राग दुर्गेश्वरीने कार्यक्रमाची सांगता केली. सूर आणि ताल यांचा सुंदर मिलाफ साधताना सभागृहात एक सांगितिक चैतन्य निर्माण केले. सतारवादनाने उमटणारे प्रसन्न स्वर श्रोत्यांच्या मनावर आनंदाच्या लहरी निर्माण करीत होते.

अर्जुन वर्मा यांचे सतारवादन आणि उन्मेष बॅनर्जी यांच्या तबल्याच्या जुगलबंदीने कार्यक्रमाला विशेष उंची लाभली. तबल्याच्या संगतीत रंगलेली ही शास्त्रीय संगीताची सुरेल मैफल रसिकांसाठी अविस्मरणीय पर्वणी ठरली. उपस्थित श्रोत्यांनी आंतरराष्ट्रीय सतारवादक अर्जुन वर्मा व तबलावादक उन्मेष बॅनर्जी यांच्या संगीतसाधनेला टाळ्यांचा कडकडाट करीत दाद दिली. सचिन रणदिवे व प्रा. पौर्णिमा मोरे यांनी सूत्रसंचालन केले. सचिन रणदिवे यांनी प्रास्ताविकात आंतरराष्ट्रीय सतारवादक अर्जुन वर्मा व तबलावादक उन्मेष बॅनर्जी तसेच चौगुले ग्लोबल ग्रुप व चौगुले इंडस्ट्रीज परिचय करून दिला. विजय चौगुले यांनी स्वागत केले.

### संगीत परंपरेचा उज्ज्वल इतिहास

हिंदूस्थानी शास्त्रीय संगीत तसेच संस्कृतीला उज्ज्वल, समृद्ध परंपरा लाभली आहे. संगीत क्षेत्रातील विविध घराण्यांनी हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत समृद्ध केले आहे. शास्त्रीय संगीत ही साधना असून साधना करणाऱ्या तसेच ते स्वर्गीय स्वर ऐकणाऱ्या श्रोत्यांनाही देवतांच्या तत्वाची अनुभूती घेता येते. हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत परंपरेच्या उज्ज्वल इतिहासाचा हा प्रसन्न अनादी प्रवास निरंतर राहील.

**अर्जुन वर्मा, आंतरराष्ट्रीय सतारवादक.**